**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत अयोध्येतल्या श्रीराम मंदिरात ध्वजारोहण सोहळा संपन्न.**
2. **नवीन कामगार कायद्यांमुळे ७७ लाख अतिरिक्त रोजगार निर्माण होऊन बेरोजगारीत १ पूर्णांक ३ दशांश टक्केपर्यंत घट होईल, असा भारतीय स्टेट बँकेचा अंदाज.**
3. **बांबू लागवड उपक्रमांचा विस्तार आणि वनविकास महामंडळाच्या लाकूड संसाधनांमधून भांडवल उभारण्याच्या वनमंत्र्यांच्या नागपुरात सूचना.**
4. **आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विदर्भात प्रचार सभा.**
5. **भारत आणि दक्षिण आफ्रिका कसोटी सामन्यात, चौथ्या दिवस अखेर भारताला ५२२ धावांची आवश्यकता.**

**अयोध्या सोहळा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या उपस्थितीत आज अयोध्येमधल्या राम मंदिरावर धर्मध्वजारोहण झालं. राममंदिराचं बांधकाम पूर्ण झाल्यानिमित्त हे ध्वजारोहण करण्यात आलं आहे. धर्मध्वजारोहणाच्या या सोहळ्यानिमित्त अयोध्यानगरी आज भारताच्या सांस्कृतिक जाणिवेच्या सर्वोच्च क्षणाची साक्षीदार बनली असून संपूर्ण देश आज राममय झाला आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान मोदी यांनी यावेळी केलं. हा धर्मध्वज भारतीय संस्कृतीच्या पुनर्जागरणाचा ध्वज असून येणाऱ्या पिढ्यांना हा श्रीरामांची शिकवण देत राहील, असं पंतप्रधान म्हणाले.

***ये धर्म ध्वजा केवल एक ध्वजा नहीं, ये भारतीय सभ्यता के पुनर्जागरण का ध्वज है। इसका भगवा रंग इस पर रची सूर्यवंश की ख्याति, वर्णित होम शब्द और अंकित कोविदार वृक्ष रामराज्य की कीर्ति को प्रतिरोपित करता है।ये ध्वज संकल्प है ये ध्वज सफलता है यह ध्वज संघर्ष से स्वजन की गाथा है। यह ध्वज सदियों से चले आ रहे स्वप्नों का साकार स्वरूप है.***

पंतप्रधानांनी सर्वांना धर्मध्वज सोहळ्याच्या शुभेच्छा दिल्या. तसंच अयोध्येतील राम मंदिराच्या निर्माणासाठी ज्यांनी योगदान दिलं, त्यांचं अभिनंदन केलं. प्रभू श्रीराम यांनी अयोध्येतून आपल्या जीवनाला सुरुवात केली. सर्वसामान्य माणूस मर्यादा पुरुषोत्तम बनू शकतो हे अयोध्येमुळेच समजलं. आदर्श मूल्यांना आचरणात आणण्याची शिकवण इथूनच मिळते असं पंतप्रधान म्हणाले. रामाकडून प्रेरणा घेऊन येणाऱ्या पिढ्यांसाठी देशाचा पाया भक्कम करण्याचा संकल्प यावेळी पंतप्रधानांनी केला.

**सर्वोच्च न्यायालय-निवडणुका**

राज्यातल्या ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथं आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडू नका, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयानं आज निवडणूक आयोगाला केली. स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात असल्याप्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि

न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाशी चर्चा सुरू असल्याची माहिती राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयाला दिली. त्यानंतर पीठानं या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारपर्यंत पुढं ढकलली. २ डिसेंबर रोजी होणाऱ्या २४२ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये ५७ संस्थांमध्ये आरक्षणाची कमाल मर्यादा ओलांडली जात असल्याची माहिती निवडणूक आयोगाचे वकील बलबीर सिंह यांनी दिली.

**कामगार कायदे**

नवीन कामगार कायद्यांमुळे ७७ लाख अतिरिक्त रोजगार निर्माण होऊन बेरोजगारीत १ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांपर्यंत घट होईल, असा अंदाज भारतीय स्टेट बँकेच्या एका अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबरपासून लागू झालेल्या या कायद्यांमुळं संघटित कामगारांचं प्रमाण किमान १५ टक्क्यांनी वाढून सुमारे साडे ७५ टक्क्यांपर्यंत जाईल. आजघडीला हे प्रमाण ६० पूर्णांक ४ दशांश टक्के असल्याचा अंदाज आहे. सध्या देशभरात असंघटित क्षेत्रातल्या कामगारांची संख्या सुमारे ४४ कोटी इतकी असून त्यापैकी जवळपास ३१ कोटी कामगारांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी केली आहे.

**वनमंत्री गणेश नाईक**

वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली काल नागपुरातील सेमिनरी हिल्स इथल्या हरिसिंग सभागृहात वनविभागाची आढावा बैठक पार पडली. विभागाच्या संरचनात्मक विस्तार, आर्थिक सबलीकरण आणि विविध प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. बैठकीत 'ग्लोबल वॉर्मिंग ते ग्लोबल कुलिंग' हा माहितीपट तसंच *IFS Probationers Onboarding* आणि *Rhythms of the Wild* या पुस्तकांचं प्रकाशनही करण्यात आलं. वनमंत्र्यांनी प्रत्येक परिक्षेत्रात किमान १०० हेक्टरमध्ये सागवानाची लागवड, बांबू लागवड उपक्रमांचा विस्तार आणि वनविकास महामंडळाच्या लाकूड संसाधनांमधून भांडवल उभारण्याच्या सूचनाही दिल्या. ताडोबा परिसरात ५०० फुटांची 'बांबू वॉल' उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव, तसंच प्रत्येक प्रवेशद्वारावर सुविधायुक्त विश्रांतीगृह उभारण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**संविधान दिन**

हमारा संविधान - हमारा स्वाभिमान ही उद्या देशभरात साजऱ्या होणाऱ्या संविधान दिनाची संकल्पना आहे. नवी दिल्लीतल्या संविधान सदनात मुख्य समारंभ होणार असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, अनेक केंद्रीय मंत्री आणि खासदार यावेळी उपस्थित राहणार आहेत. २६ नोव्हेंबरला संविधान दिवस जाहीर करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचं स्मरण केल्याबद्दल संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी प्रसार माध्यमांवरच्या पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

**फडणवीस/ शिंदे-प्रचार**

आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रचार प्रसार केला. अकोला जिल्ह्यातील तेल्हारा, अकोट आणि हिवरखेड नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी

आज हिवरखेड इथं प्रचाराचा नारळ फोडत भाजपा उमेदवारांना विजयी करण्याचं आवाहन केलं. इथल्या तिन्ही नगरपरिषदांचा चेहरा बदलण्याची ब्लूप्रिंट आमच्याकडं तयार आहे. शेतकऱ्यांसाठी मोफत वीज योजना सुरूच ठेवणार असल्याचं सांगत त्यांनी सौर ऊर्जेच्या माध्यमातून २४ तास वीजपुरवठ्याचं आश्वासन दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र सरकार सक्षमपणे काम करत आहे. विरोधकांनी कितीही अफवा पसरवल्या, तरी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी आज नगरपरिषद, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी अमरावती जिल्ह्यातील धारणी इथं प्रचार सभेत बोलताना दिली. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाचे भाजपा उमेदवार पंडितराव देशमुख आणि सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ विराट जाहीर सभा आज मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतली. सामान्य नागरिकांच्या आशा- आकांक्षा पूर्ण करण्याचा आपल्या पक्षाचा प्रयत्न असेल, असं ते यावेळी म्हणाले. तत्पश्चात ओबीसी आरक्षणाबाबत त्यांनी प्रतिक्रिया दिली -

***या निवडणूक निर्विघ्नपणे पार पडण्याकरिता जी काही विनंती आहे ते सर्वोच्च न्यायालयाकडे या ठिकाणी मान्य करेल. आजही बोलताना सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाबद्दल अतिशय सकारात्मक टिप्पणी त्या ठिकाणी केलेली आहे. इतकच नाही तर जो काही जुना निर्णय आहे. त्या निर्णयाचं पुनरावलोकन केलं पाहिजे अशा प्रकारची टिप्पणी त्या ठिकाणी केलेली आहे. त्यामुळे मला आज तरी अशी अपेक्षा आहे की या निवडणुका निर्विघ्नपणे पार पडतील. पण अर्थातच शेवटी हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाला घ्यायचा आहे. त्यामुळे त्या संदर्भात यापेक्षा जास्त आपण बोलू शकत नाही.***

दरम्यान, मुख्यमंत्री असताना भंडारा मतदारसंघात ३,००० कोटींचा विकास घडवून आणला असून प्रकल्पग्रस्तांसह शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी धान बोनस आणि सन्मान योजना राबवली, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भंडारा इथं आयोजित प्रचारसभेत सांगितलं.

**हर्ष पोद्दार**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहयाने कृषी जलसंधारण या क्षेत्रामध्ये मार्वल कंपनीने सिंधुदुर्ग जिल्ह्यात काही प्रयोग केले होते. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सीसीटीव्हीच्या माध्यमातून गर्दीच्या ठिकाणी कोणाजवळ शस्त्र आहेत का किंवा कोणी हरवलेल्या व्यक्ती या गर्दीमध्ये आहेत का, याचा शोध कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे घेतला जातो, अशी माहिती नागपूर ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ.हर्ष पोद्दार यांनी दिली. नवरात्र काळात मार्वल कंपनीचं गर्दी व्यवस्थापनासाठीचे सॉफ्टवेअर सोल्युशन राबविण्यात आले, अशी माहिती देखील त्यांनी दिली-

***सीसीटीव्ही टीव्हीमध्ये गर्दीचे जे स्थान आहे. त्याठिकाणी गर्दी आहे. तिथे सीसीटीव्हीचे माध्यमातून आम्ही हे डिटेक्ट करू शकता की गर्दीचे ठिकाण ला किती लोक आहेत त्यांच्याकडे काही संशयास्पद वस्तू जसे की आर्म्स वगैरे नाही किंवा काही हरवलेले मुलं पण किंवा मुली जर आहे त्यांचा फोटो आम्ही अपलोड करून त्यांना डिटेक्ट करून नवरात्र काळात जगदंबा मंदिर कोरडीला जे आहे तिथे मार्वलचे जे हे सोल्युशन आहेत क्राऊड कण्ट्रोलसाठी तिथे आम्ही कार्यान्वित केला होता.***

**धान खरेदी**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ नाशिक, प्रादेशिक कार्यालय चंद्रपूर अंतर्गत शासनाच्या निर्देशनानुसार खरीप पणन हंगाम 2025-26 साठी 3 नोव्हेंबरपासून धान खरेदी सुरू झाली आहे. चिमूर, नागभीड, सिंदेवाही, वरोरा, भद्रावती, गोंडपिपरी, राजुरा आणि पोंभुर्णा या 8 तालुक्यातील एकूण 33 खरेदी केंद्रावर धान खरेदी करण्यात येत आहे.

**कसोटी क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात गुवाहाटी इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, भारताला ५२२ धावांची गरज आहे. सामन्याच्या आजच्या चौथ्या दिवशी, दक्षिण आफ्रिकेने दुसर्या डावात २६ धावांपासून पुढे खेळण्यास सुरुवात केली. शेवटचं वृत्त हाती आलं, तेव्हा त्यांच्या चार बाद १८७ धावा झाल्या होत्या. भारताचा पहिला डाव २०१ धावांवर संपुष्टात आला होता.

******